स.फौ.ख.क्र. ५२४/२०२१
तिलोत्तमा व १ / अशोक व १
निशाणी क्र.

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पालघर (कोर्ट नं. १) यांचे न्यायालयात</u>**

<u>पिठासिन अधिकारी : वि. प्र. खंदारे</u>

## <u>गुन्हयाचा तपशिल</u>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याच्या दिनांक | : | | ०१/०२/२०२१ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | : | | १६/०४/२०२१ |
| ३. | फिर्यादीचे नाव | : | १) | तिलोत्तमा रविंद्र चौधरी,<br>वय : ६२ वर्षे, धंदा : व्यवसाय, |
| | | | २) | मृदुला भूषण सावे,<br>वय : ४४, धंदा, व्यवसाय,<br>दोघेही रा. केळवे जसोडी,<br>ता. व जि. पालघर. |
| ४. | आरोपीचे नाव | : | १) | अशोक मधु शेट्टी,<br>वय : ५६ वर्षे, धंदा :<br>रा. ५, इंदुकमल अपार्टमेंन्ट, १ मजला,<br>प्रभू आळी, पारनाका, वसई,<br>ता. वसई, जि. पालघर. |
| | | | २) | सुधाकर देजप्पा शेट्टी,<br>वय : ५५, धंदा :<br>रा. ३०१/३, रामबाग हाउसिंग सो.,<br>पारनाका, वसई, ता. वसई, जि. पालघर. |
| ५. | कायदयाचे नाव व कलम | : | | पराक्राम्य अभिलेख कायदाचे कलम<br>१३८ प्रमाणे. |
| ६. | गुन्हयाचा तपशील | : | | |

तुम्ही फिर्यादीकडुन हॉटेल व्यवसायाकरीता देय रक्कम रुपये ७,५९,३०१/— च्या परफेडीकरिता तुम्ही फिर्यादीला दिनांक ०१/०२/२०२१ रोजी तुमच्या भारतीय स्टेट बॅक, शाखा वसई चे प्रत्येकी रूपये २,५०,०००/— चे धनादेश क्र. २४९०२१ व २४९०२२ आणि रुपये २,५९,३०१/— चा धनादेश क्र. २४९०२३ दिले होते. तसेच तीन महिन्याच्या मोबदल्यापोटी देय रक्कम रुपये १,३५,०००/— च्या परतफेडीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये ६७,५००/— चे धनादेश क्र. २४९०२४ व २४९०२५ दिले होते.

सदरचे सर्व धनादेश वटविण्याकरिता ते फिर्यादीने त्यांच्या वसई विकास बॅक, शाखा पालघर येथे सादर केले असता सदरचे सर्व धनादेश *'पेमेंन्ट स्टॉपड् बाय ड्रॉवर'* या शेऱ्यासह दिनांक ०२/०२/२०२१ रोजी न वटवता परत आले.

त्यानंतर फिर्यादीने तुम्हाला दिनांक ०१/०३/२०२१ रोजी रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठवुन धनादेश रक्कमेची मागणी केली. सदर नोटीस तुम्हांला दिनांक ०३/०३/२०२१ रोजी प्राप्त झाली. परंतु तरीसुध्दा तुम्ही १५ दिवसांमध्ये सदर धनादेश रक्कम फिर्यादीला दिली नाही. त्यामुळे तुम्ही माझ्या अखत्यारीत पराक्राम्य अभिलेख कायद्याचे कलम १३८ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

ठिकाण : पालघर
दिनांक : २४/११/२०२१

( वि. प्र . खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालघर.
( कोर्ट नं. १ )

७. **<u>आरोपीचे प्रतिवेदन</u>**

प्रश्न क्र. १ : तुम्हाला खटल्यामधील तक्रारीच्या नकला मिळाल्या का ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला गुन्हयाचा तपशिल समजला काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : नाही.

आरोपीची सही

———————— माझे समक्ष

दिनांक : २४/११/२०२१ ( वि. प्र. खंदारे )
ठिकाण : पालघर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालघर.
( कोर्ट नं. १ )